# मृणालिनी देसाई यांच्या 'पुत्र मानवाचा' कादंबरीतील गांधी विचारांचे प्रतिबिंब

**श्री. लक्ष्मण किसन बोराटे,** मराठी विभाग, श्री शिव-शाहू महाविद्यालय, सरुड, ता. शाहूवाडी जि. कोल्हापूर.

---

इ. स. १९२० नंतरचे पर्व खऱ्या अर्थाने भारतीय राजकारणात, समाजकारणात गांधीजीच्या उदयाने सुरू झाले. भारतीय समाजजीवनावर गांधीजींचा प्रभाव हळूहळू जाणू लागला. सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक या सर्व क्षेत्रात परिवर्तन घडत गेले. अशा परिवर्तनाचा परिणाम साहित्यामध्ये नकळत उमटू लागला. या कालखंडात अनेक परिवर्तनीय, विचारवादी कादंबऱ्या उदयास येऊ लागल्या. गांधीवादी विचारसरणीचा प्रभाव भारतीय लोकांवर खूप प्रमाणात जाणवत होता. त्यामुळे अनेक नवलेखक गांधीजींना समोर ठेवून आपली साहित्य साधना करू लागले. गांधीजींच्या सहवासातून अनेक व्यक्तिमत्व घडू लागली. लहान वयापासूनच मृणालिनी देसाई यांना स्वातंत्र्यसंग्रामात सहभाग घ्यावासा वाटत होता. त्यामुळेच महात्मा गांधीजींचा प्रभाव त्यांच्यावरती खूप प्रमाणात दिसून येत होता. याचे उदाहरण म्हणजे "काही माणसे अंत: प्रेरणेवरच आपल्या जीवनाचे ध्येय ठरवीत असतात. मृणालिनीताईंचेही तसेच झालेले असावे. नाहीतर वयाच्या तिसऱ्या वाढदिवसाला शिवलेला परदेशी कपड्याचा सुंदर फ्रॉक त्यांनी परदेशी कपड्याच्या होळीत फेकला नसता. इंदिरा गांधीजींनीसुद्धा आपली सुंदर परदेशी बनावटीची बाहुली परदेशी वस्तूंच्या होळीत टाकली. त्या घटनेचे येथे स्मरण होते." [१] शालेय जीवनापासूनच मृणालिनीताई यांनी स्वातंत्र्य लढ्यात सक्रिय सहभाग घेतला होता. स्वातंत्र्य लढ्यातील सहभागामुळे त्यांना अनेक वेळा तुरुंगवास भोगाव लागला. त्यांच्यावर महात्मा गांधीजींच्या विचारांचा फार मोठा प्रभाव होता. सेवाग्राममध्ये त्यांनी महात्मा गांधीजींची भेट घेतली. पंडित नेहरू, पटेल या नेत्यांच्या भाषणांमुळे त्यांचे देशप्रेम अधिकाधिक चेतविले गेले म्हणून त्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी मरण पत्करण्याची शपथ घेतली होती. तुरुंगवास भोगत असताना त्यांच्या वाट्याला हाल अपेष्टा आल्या. स्वतः न डगमगता हे सर्व त्यांनी सहन केले. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला होता. गांधीजींच्या जीवनाचा प्रभाव त्यांच्यावरती जाणवत होता. म्हणूनच गांधीजींच्या जीवनावर त्यांच्या स्वातंत्र्यलढ्याचे केंद्र धरून त्यांनी 'पुत्र मानवाचा' (१९६८) या नावाची कादंबरी लिहिली.

कोणतीही कला जन्मजात मिळावी लागते किंवा ती परंपरेने संक्रमित व्हावी लागते. वाङ्मय लेखनही याला अपवाद नाही. साहित्य निर्माण होत असताना त्याचे नाते परंपरेशी जोडणे महत्त्वाचे असते. प्रतिभावंत लेखक नेहमीच विश्वासनीय साहित्यकृती निर्माण करीत असतो. काकासाहेब कालेलकर यांच्या वाङ्मयाची छाप मृणालिनी देसाई यांच्या वाङ्मयावर पडलेली दिसून येते. गांधीजींच्या जीवनावर, त्यांच्या स्वातंत्र्यलढ्याचे केंद्र धरून त्यांनी 'पुत्र मानवाचा'या नावाची गांधी चरित्रात्मक कादंबरी लिहिली. काकासाहेब कालेलकर यांची व महात्मा गांधीजींची भेट १९१५ मध्ये 'साबरमती' आश्रमात झाली. तेव्हा या दोघांनी एकत्रित वास्तव्य केल्याचे दिसून येते, त्यामुळेच गांधीजींच्या चरित्राविषयी अधिकाधिक माहिती मृणालिनी देसाई यांना मिळत गेली आणि गांधीवादी विचारांचे प्रतिबिंब त्यांच्या कादंबरीत उमटले.

'पुत्र मानवाच्या'या कादंबरीचे कथानक वाचकांच्या मनावर चिरकाल प्रभाव टाकते. गांधीवादी विचारसरणी व गांधी चरित्र वेगळ्या अंगाने उलगडण्याचे काम मृणालिनी देसाई यांनी केलेले दिसते. प्रस्तुत कादंबरी एकूण ३८४ पानांत व ४४ प्रकरणामध्ये विभागलेली आहे. कादंबरी वाचत असताना कादंबरीचे कथानक उगवत्या भाषेत आलेले दिसते. कादंबरीचा प्रारंभ, मध्य व शेवट हा वाचकाला आकर्षित करणारा असा आहे. मृणालिनी देसाई यांनी महात्मा गांधीजींच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी दिलेल्या लढ्याची कहाणी प्रस्तुत कादंबरीत रेखाटली आहे. कादंबरीचा नायक हा 'मी' या पात्रातून व्यक्त होतो. त्याच्या घरातील वातावरण गांधीवादी विचाराने प्रेरित झालेले दिसते. दद्दाजी, निशा, आई, स्नेहल व घरातील इतर सदस्य गांधीजींच्या विचारांचे उपासक आहेत. संपूर्ण कुटुंब हे गांधीजींच्या विचारांचा आयुष्यभर अंगीकार करणारे आहे. गांधीजींच्या नेतृत्वगुणांचा खरा परिचय चंपारण्यातील निळीच्या सत्याग्रहामुळे होतो. निळीच्या कामगारांनी सरकारच्या आणि गोऱ्या मळेवाल्यांच्या विरोधात साक्ष देण्याचे ठरवले आहे, हे कळल्यावर गांधीजींनी त्या कामगारांचे नेतृत्व केले. गांधीजींच्यामध्ये दैवी शक्ती असल्याचा लोकांचा समज होता. गांधीजींचा सत्याग्रहाचा मार्ग खडतर असल्यामुळे अनेक लोक त्यापासून लांब होते. निवेदकाच्या वडिलांना राजकारणात मानाचे स्थान असल्यामुळे त्यांचाही स्वातंत्र्यलढ्यात सहभाग होता. ते गांधीवादी विचारांचे उपासक होते. अनेक वेळा गांधीजी या कुटुंबातील सदस्यांना भेटलेले आहेत. त्यामुळे संपूर्ण कुटुंबावर गांधीवादी विचारांची छाप पडलेली दिसून येते. गांधीजी नेहमी प्रवास

करताना तिसऱ्या डब्यातून करत असत. देशभर प्रवास, दौरे करून गांधीजी देशातील लोकांना सत्याग्रहाविषयी माहिती देत. आपल्या सत्याग्रहाची माहिती ते 'सत्याग्रही'या अंकात नेहमी मांडत. त्यांच्या या कार्यामुळे त्यांना अटक होते. अटकेची बातमी समजताच देशाच्या कानाकोपऱ्यात 'महात्मा गांधी की जय' अशा घोषणा उमटतात. महात्मा गांधीजी नेहमीच आपल्या सहकाऱ्यांना 'स्वतःची कामे स्वतः करा' असा मंत्र देत. महात्मा गांधीजींच्या विचारांचा प्रभाव म्हणजे चरख्यामुळे लोकांना सूत मिळते आणि स्वदेशीची जाणीव होते. याचाच प्रत्यय ३१ जुलै रोजी मुंबईमध्ये लोकांनी परदेशी कपड्यांची होळी केली तेव्हा आला. महात्मा गांधीजी हिंदुस्थानचे प्रतिनिधी करत असल्यामुळे ब्रिटिश राज्यकर्ते नेहमीच त्यांच्याशी चर्चा करत. सत्याग्रहाची सूत्रे गांधीजींच्या हातात असल्यामुळे त्यांनी लोकांचे सक्षम नेतृत्व केले होते.

हिंदुस्थानात हिंदू-मुसलमान यांच्यामध्ये वैमनस्य वाढतच होते त्याचा फायदा ब्रिटिश राज्यकर्ते नेहमीच उठवत. एक दिवस पठाण व शिख यांच्यामध्ये दंगल घडवण्यात आली. याचा निषेध म्हणून महात्मा गांधीजींनी एकवीस दिवस उपवास केला. यावेळी सर्वांनी गांधीजींचे उपवास थांबवण्याचे प्रयत्न केले. परंतु त्यांना यश आले नाही. गांधीजींनी अस्पृश्य लोकांसाठी सत्याग्रहाचा मार्ग अवलंबला होता. लोकांचे प्रश्न वेळोवेळी शासनापर्यंत पोहोचवण्याचे काम त्यांनी केले. आश्रमातील लोकांवरती ते मुला-मुलींप्रमाणे प्रेम करत. गांधीजींनी साम्राज्यांतर्गत स्वातंत्र्य मिळावे म्हणून सरकारला १९२८ पर्यंतची मुदत दिली होती. ती मुदत संपल्यामुळे राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष पंडित जवाहरलालजी यांच्या मार्गदर्शनाखाली २६ जानेवारीला पहिला स्वातंत्र्य दिन म्हणून संपूर्ण देशात साजरा करण्यात आला. महात्मा गांधीजींनी ७९ स्वयंसेवकाबरोबर दांडी यात्रा काढून मिठाचा सत्याग्रह केला. एके ठिकाणी आश्रमाला उद्देशून बापू म्हणतात, "तसेच चालायला हवे आता, कारण आता स्वातंत्र्य मिळाल्याखेरीज मी थोडाच तेथे जाणार आहे." [२] महात्मा गांधीजींना गोलमेज परिषदेत अपयश आले होते. गांधीजींनी पुकारलेला सत्याग्रह मागे घेण्यात आला होता. परंतु त्यांचा वैयक्तिक सत्याग्रह चालूच होता. देशात अनेक कार्यकर्त्यांना त्यावेळी अटक होत होती. ३० सप्टेंबर रोजी गांधीजींनी हरिजनांच्या विभक्त मतदार संघाविरुद्ध आमरण उपोषण पुकारले होते. अस्पृश्यांच्या हक्कासाठी तो लढा होता.

महात्मा गांधीजींना देशातील भोळी भाबडी जनता सज्जन माणूस असे म्हणत. कारण बापूंचे आचार-विचार चिरकाल टिकणारे होते. गांधीजींच्या नेतृत्वात लोकांना संपूर्ण स्वातंत्र्य हवे होते. "आमच्यात बळ नाही पण, दुसरे कोणी यांना लोळवीत असेल तर आम्ही त्यांना मदत करू- निदान त्यांच्या आड तरी येणार नाही." [३] अशा विचारांनी संपूर्ण देश पेटून उठला होता. अनेक नेत्यांच्या चळवळींना धार आली होती. गांधीजी स्वातंत्र्यप्राप्तीसाठी वेगवेगळे मार्ग अवलंबून उपवास करत होते. सततच्या उपवासामुळे त्यांची तब्येत दिवसेंदिवस खालावत चालली होती. अशातच बॅरिस्टर जीना पाकिस्तानच्या निर्मितीच्या तयारीत होते. गांधीजींनी जीनांना खूप समजावण्याचा प्रयत्न केला. परंतु ते ऐकण्यास तयार नव्हते. त्यामुळे देशाची फाळणी होणे अटळ होते. याच दरम्यान कस्तुरबा गांधी यांची तब्येत खालावत होती. शेवटी कस्तुरबा गांधीजींना सोडून गेल्या. तेव्हा देशात हळहळ व्यक्त होती. महात्मा गांधीजी आदर्शवादी होतेच तसेच ते झुंजार सेनापतीही होते. जीनांनी स्वतःच्या हट्टापायी स्वतंत्र पाकिस्तानची निर्मिती केली. भारताला स्वातंत्र्य मिळाले तर काय होईल याविषयी गांधीजी म्हणतात, "उद्या या लोकांना स्वातंत्र्य मिळेल. गैरसिस्त, भोळीभाबडी, आळशी प्रजा - तिला ते पेलल का? कळेल का? मला त्याची खंत लागून राहिली आहे." [४] स्वातंत्र्यानंतरही अनेक राज्य भारतात समाविष्ट होत होती. गांधीवादी विचारांमुळे सर्व जनतेने स्वतंत्र भारताची संकल्पना प्रत्यक्षात उतरवली होती. परंतु काही समाजकंटक, गांधी द्रोही, गांधी विचारसरणीला न मानणाऱ्या प्रवृत्तीचे लोक अवतीभोवती वावरत होते. याच गांधी द्वेषामुळे त्यांच्यावर गोळ्या झाडण्यात आल्या. प्रार्थनेला जात असताना या महामानवाने 'हे राम' म्हणत प्राण सोडले. गांधीजींच्या मृत्यूमुळे संपूर्ण हिंदुस्तान भावनाविवश झाला. संपूर्ण समाज हळहळ व्यक्त करून रडू लागला. अंतिम यात्रेचा सोहळा भावनिक वातावरणात पार पडला. भावना व्याकुळ झालेले पंडित नेहरू, त्यांना जेव्हा विचारण्यात आले अंतिम यात्रेची पुढची तयारी काय? तेव्हा ते म्हणतात "थांबा.... मी बापूंनाच विचारतो." गांधीजींचा अंत्यविधी पाहण्यासाठी व अखेरच्या दर्शनासाठी जनतेचा महासागर लोटला होता.

महात्मा गांधीजींच्या जीवनावर त्यांच्या स्वातंत्र्यलढ्याचे केंद्र धरून मृणालिनी देसाई यांनी 'पुत्र मानवाचा' ही चरित्रात्मक कादंबरी चित्रीत केली आहे. महात्मा गांधीजींच्या स्वातंत्र्यलढ्यातील अनेक प्रसंग प्रस्तुत कादंबरीत दिसून येतात. या कादंबरीतून महात्मा गांधीजींचे जीवन चरित्र, त्यांचा स्वातंत्र्याचा ध्यास, हरिजनांविषयीचे प्रेम, सत्यनिष्ठा, समता - बंधुता, सत्याग्रहाचे आचरण, मातृभूमीवर नितांत प्रेम, देशाविषयी अढळ श्रद्धा स्पष्ट दिसून येते. 'जननी

जन्मभुमिश्च स्वर्गादपि गरीयसी' म्हणजेच माता आणि मातृभूमी स्वर्गापेक्षा श्रेष्ठ आहे. हे महात्मा गांधीजींच्या जीवन चरित्रातून आपणाला दिसून येते. महात्मा गांधी नुसते महात्माच राहिले नाहीत तर ते पुढे राष्ट्रपिताही झाले. आपले जीवन जन्मभूमीसाठी अर्पण करणाऱ्या या महापुरुषाच्या जीवनावर चरित्रात्मक कादंबरी लिहून लेखिकेने निश्चितच मराठी वाङ्मयात मोलाची भर घातली आहे.

गांधीवादी विचारांना आजच्या काळातही खूप महत्त्व असलेले दिसते. त्यांच्या चरित्राच्या माध्यमातून अनेकांनी गांधीवादी विचार मांडण्याचा प्रयत्न केला. सर्वांनाच यश आले नाही. परंतु मृणालिनी देसाई यांच्या 'पुत्र मानवाचा'या कादंबरीतून व्यक्त झालेले विचार व मूल्य आजही समाजास प्रेरक ठरतात. प्रस्तुत कादंबरी लिहिण्यामागचा मनोदय काकासाहेब कालेलकर यांच्याजवळ मृणालिनी देसाई यांनी बोलून दाखविला तेव्हा काकासाहेब म्हणाले होते, "इतकी मेहनत करून कादंबरी लिहायची आणि मुख्य म्हणजे सत्यासाठी जे जगले आणि सत्यापाठी जे गेले त्या महात्माजीचे चित्र खोट्या कल्पनेच्या रंगाने रंगवायचे?" [५] ही कल्पनाच त्यांना रुचत नव्हती. म्हणूनच लेखिकेने निवेदकाच्या माध्यमातून जो गांधीजींच्या विचाराने प्रेरित झालेला आहे आणि तो सतत गांधीजींच्या सहवासात राहतो. जेणेकरून तो गांधीजींचे सत्य जीवन व्यक्त करू शकेल. ही कल्पना नजरेसमोर ठेवून मृणालिनीताई यांनी गांधीवादी भूमिका व गांधीजींचे जीवनदर्शन मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला दिसून येतो. प्रस्तुत कादंबरी ही अप्रतिम अशीच म्हणावी लागेल. कारण संघर्षमय वातावरणाची पार्श्वभूमी व्यक्त करताना ती मुळातच गांधीजींच्या जीवनाशी निगडितच असलेली दिसून येते. म्हणूनच या कादंबरीत स्वातंत्र्यपूर्व कालखंड खऱ्या अर्थाने संघर्षमयरित्या चित्रीत करण्यात आला आहे. मृणालिनीताई यांनी गांधीवादी विचारसरणीच्या माध्यमातून एक आदर्शवादी व्यक्तिमत्व वाचकांसमोर ठेवले आहे. याविषयी डॉ. दत्तात्रय पुंडे यांचे विधान सार्थक वाटते ते म्हणतात, "गांधीवाद हा आधुनिक भारतीय जीवनातील एक महत्त्वाचा 'वाद' आहे. भारतीय जीवनपरंपरा व येथील प्राप्त परिस्थिती ध्यानात घेऊन एका महात्म्याने संकल्पिलेला हा 'वाद' केवळ विचारात्मक पातळीवर न राहता आधुनिक भारतीय जीवनाचा एक आचारशील व्यूहही ठरला." [६]

'पुत्र मानवाचा' ही कादंबरी मृणालिनी देसाई यांनी महात्मा गांधीजींच्या जन्मशताब्दीला प्रकाशित केली. लहानपणापासूनच लेखिकेवर गांधीवादी विचारांचा प्रभाव होता. त्यांनी जवळून गांधीजी व त्यांचे विचार आत्मसात केले होते. त्यांच्या कादंबरीतून व्यक्त झालेले गांधी चरित्र विश्वसनीय ठरण्यामागील महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांना लाभलेला गांधीजींचा सहवास होय. एक सहृदय लेखिका, देशप्रेमाने भारलेली देशभक्त, जीवनाकडे आशावादी दृष्टिकोनातून बघणारी लेखिका, भारतीय स्वातंत्र्यासाठी लढण्याची जिद्द व धैर्य असणारी सबला नारी, कर्तव्य कठोर व तितकीच सौम्य, मृदुता असणारी, परंपराचे अनुसरण करणारी सिद्धहस्त लेखिका म्हणून मृणालिनी देसाई यांचे नाव मराठी साहित्यात निश्चितच वरच्या दर्जाचे ठरते.

**संदर्भ :-**

**१.** 'स्त्री साहित्याचा मागोवा', खंड - २ इ. स. १९५१ ते इ. स. २०००, साहित्यप्रेमी भगिनी मंडळ, पुणे. यांचा संयुक्त प्रकाशन. पृष्ठ :- २०४.

**२.** देसाई मृणालिनी, 'पुत्र मानवाचा', पॉपुलर प्रकाशन, मुंबई ३४. प्रथम आवृत्ती. २ ऑक्टोबर १९६९, गांधी जन्मशताब्दी. पृष्ठ - १४२.

**३.** तत्रैव, पृष्ठ - २३३.

**४.** तत्रैव, पृष्ठ - ३२९.

**५.** तत्रैव, पृष्ठ - १४ प्रस्तावना.

**६.** पुंडे दत्तात्रय, 'गांधीवाद आणि आधुनिक मराठी साहित्य', प्रतिमा प्रकाशन पुणे. प्रथम आवृत्ती. मलपृष्ठ.